# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सायकांळ)

जा.क्र. ५३३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—२३/०८/२०१६

**१) अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २२/०८/२०१६ रोजी १६.०० वा. दर. यातील फिर्यादी व आरोपी हे दोन्ही एकाच गावचे व एकाच जातीचे असुन यातील आरोपी हा फीर्यादीचा नातेवाईक असुन यातील आरोपीने अल्पवयीन फिर्यादीस लग्नाचे आमिष दाखवुन तिच्या सोबत जबरी अत्याचार केला याबाबत कोणाला काही सांगितले तर जीवाने मारण्याची धमकी देवुन अल्पवयीन फिर्यादीस गर्भवती करण्यास कारणीभुत झाला. व फिर्यादीवर सतत लैंगिक अत्याचार करुन तिला गर्भवती केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ३७६(१),५०६ भांदवि सहकलम ४,५(ज)(२) बाल संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. यादव पो.स्टे. दिघोरी करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) सार्वजनिक ठिकाणी वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभे करून मिळून आल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक २२/०८/०१६ रोजी १८.४३ वा. दरम्यान काळी पिवळी गाडी क्र. एमएच ३६/३०१९ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन दिघोरी बस स्टॅन्ड येथे सार्वजनिक रोडवर ऊभे करून येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जीवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभे करून मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोउपनि. डोंगरे पो.स्टे. दिघोरी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम २८३ भादंवि सहकलम १३०(१)/१७७ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोउपनि. डोंगरे पो.स्टे. दिघोरी हे करीत आहेत.

**३) वैनगंगा नदीचे पात्रात इसमाचे प्रेत मिळुन आले. :—**

दिनांक १९/०८/२०१६ रोजी १०.०० वा. ते २२/०८/२०१६ चे ७.४५ वा. दर. यातील फिर्यादी फुलचंद हरीचंद बुरडे वय ३४ वर्ष, रा. गुंजेपार यांचा मोठा भाऊ मृतक ताराचंद हरीचंद बुरडे वय ३९ वर्ष, रा. गुंजेपार हा असुन मृतक वर नगदी ६५,०००/—रु. चे शेतीचे कर्ज असल्याने तो नेहमी गुमसुम राहत असे दि. १९/०८/२०१६ चे १०.००वा. दर. पासुन तो गुम होता. आज दि. २२/०८/२०१६ चे ७.४५ वा. दर. कारधा शिवार वैनगंगा नदी पात्रात मृत अवस्थेत मिळुन आल्याने मृतक याने शेतीच्या कर्जाला त्रासुन आत्महत्या केली असावी असे फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील चौकशी सफौ. नान्हे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**४) दारूडया वाहन चालकांवर कारवाई. :—**

दिनांक २२/०८/२०१६ रोजी २०.३० वा. दर. दरम्यान आरोपी मोटार सायकल क्र. एमएच ३६/व्ही २५६ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील मोटार सायकल दारू पिवुन दारूच्या नशेत पोस्ट ऑफीस चौक भंडारा येथे चालवितांना मिळुन आला. त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशिन व्दारे चेक केले असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आले. असे सर तर्फे फिर्यादि पोहवा. बडवाईक वानिशा भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५(१) मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास सपोनि. रायपुरे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

( श्री.एस. टी. घुसर )
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५६१९१९१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.